# Mahindra
Rise.

# महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय:** गेटवे बिल्डिंग, अपोलो बंदर, मुंबई-४०० ००१.
कंपनी ओळख क्रमांक : L65990MH1945PLC004558
वेबसाइट : www.mahindra.com • ईमेल : investors@mahindra.com
टेलि.: +९१ २२ २२८९५५०० • फॅक्स: +९१ २२ २२८७५४८५

# सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लिमिटेडची एकोणसत्तरावी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता बिर्ला मातोश्री सभागर, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग (न्यू मरीन लाइन्स), मुंबई-४०० ०२० येथे भरविण्यात येईल. या सभेत केल्या जाणाऱ्या सर्वसामान्य व विशेष व्यवहाराविषयीची सूचना आणि त्यासोबत (१) दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित हिशोब व लेखापरीक्षकांचे आणि संचालकांचे अहवाल आणि (२) दि. ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित एकत्रित हिशोब व लेखापरीक्षकांचा त्यावरील अहवाल हे सर्व सभासदांना पाठविण्यात येत आहे.

वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहून मत देण्यास पात्र असलेला सभासद त्याच्या ऐवजी सभेस उपस्थित राहण्यासाठी आणि मत देण्यासाठी प्रॉक्सी(प्रतिनिधी) नेमण्यास पात्र आहे आणि असा प्रॉक्सी(प्रतिनिधी) सभासद असण्याची गरज नाही.

ह्यानंतर कंपनी कायदा २०१३ मधील कलम ९१ मधील तरतूदींनुसार आणि त्यातील लागू नियमानुसार पुढील सूचना देण्यात येत आहे की, कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये, ३१ मार्च, २०१५ रोजी समाप्त झालेल्या वर्षासाठी, जाहीर केला जाऊ शकणारा लाभांश ₹ १२.०० दर सामान्य (इक्विटी) शेअर, ज्यांचे दर्शनी मूल्य ₹ ५.०० आहे, ज्यांना चुकता करावा लागेल त्या सभासदांच्या नावांची यादी निश्चित करण्यासाठी कंपनीचे सभासदांचे रजिस्टर व शेअर ट्रान्सफर बुक्स शनिवार १८ जुलै, २०१५ ते शुक्रवार ७ ऑगस्ट, २०१५ ह्या कालावधीत (दोन्ही दिवस धरुन) बंद राहतील. कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये जर लाभांश घोषित केला गेला तर तो त्या सभासदांना किंवा त्यांच्या अधिकृत व्यक्तींना चुकता केला जाईल जे:

अ) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण केलेल्या शेअर्सच्या संदर्भात नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड यांच्याद्वारे देण्यात येणाऱ्या लाभार्थी मालकांच्या यादीमध्ये १७ जुलै २०१५ रोजी कामाच्या वेळेच्या अखेरीस ज्यांची नावे आढळतील ते लाभार्थी मालक, आणि

ब) १७ जुलै २०१५ रोजी वा तत्पूर्वी कंपनी/तिचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट्स म्हणजे शेअरप्रो सर्व्हिसेस (इंडिया) प्रा. लि. (''शेअरप्रो'') यांच्याकडे दाखल केलेल्या फिजिकल फॉर्ममधील वैध शेअर ट्रान्सफर्सची कार्यवाही केल्यानंतर कंपनीच्या सभासदांच्या यादीमध्ये ज्यांची नावे आढळतील ते सभासद.

ज्या सभासदांना लाभांशाची रक्कम इलेक्ट्रॉनिक माध्यमाने मिळविण्याची इच्छा असेल त्यांना अशी विनंती करण्यात येत आहे की त्यांनी कंपनी/शेअरप्रो/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सना विहित मसुद्यात आणि निर्दिष्ट तपशीलांसह दि. १७ जुलै २०१५ पूर्वी तशी सूचना द्यावी.

**महिन्द्रा ॲण्ड महिन्द्रा लिमिटेड करिता**
सही/-

नारायण शंकर
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
तारीख : ८ जुलै, २०१५

**रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट्स :**
शेअरप्रो सर्विसेस (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड
१३ एबी, संहिता वेअरहाऊसिंग कॉम्प्लेक्स, २रा मजला,
साकीनाका टेलिफोन एक्स्चेंज लेन, अंधेरी-कुर्ला रोडच्या बाजूला,
साकीनाका, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०७२.
फोन : (०२२) ६७७२०३००/६७७२०४००, फॅक्स : (०२२) २८५९१५६८
ई मेल : sharepro@shareproservices.com

582634MAR